क्रमांक : २३००९ /ई-१
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई.
दिनांक : १७ नोव्हेंबर, २०२२.

**:: परिपत्रक ::**

**विषय : महाराष्ट्र विधानपरिषदेचे सन २०२२ चे तिसरे (हिवाळी) अधिवेशनातील तारांकित प्रश्नांच्या उत्तराकरीता नेमून देण्यात आलेल्या दिनांकाबाबतचे विवरणपत्र**

महाराष्ट्र विधानपरिषदेचे सन २०२२ चे तिसरे (हिवाळी) अधिवेशन सोमवार, दिनांक १९ डिसेंबर, २०२२ रोजीपासून विधान भवन, नागपूर येथे सुरु होणार आहे. सोमवार, दिनांक १९ डिसेंबर, २०२२ ते शुक्रवार, दिनांक ३० डिसेंबर, २०२२ या कालावधीतील तारांकित प्रश्नोत्तराबाबतची माहिती दर्शविणारे विवरणपत्र (मागील पृष्ठावर छापल्याप्रमाणे) आपल्या माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी पाठविण्यात येत असून या सचिवालयाच्या www.mls.org.in या संकेतस्थळावर देखील उपलब्ध करुन देण्यात येत आहे. **त्याअनुषंगाने मंत्रालयीन विभागांना खालीलप्रमाणे कार्यवाही करण्याबाबत सुचित करण्यात येत आहे :-**

**(१) महाराष्ट्र विधानपरिषद तारांकित प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी मा.मंत्री महोदयांना नेमून देण्यात आलेले दिनांक विवरणपत्राच्या स्तंभ (३) मध्ये व मंत्रालयीन विभागास नेमून देण्यात आलेले दिनांक विवरणपत्राच्या स्तंभ (४) मध्ये दर्शविण्यात आले आहेत.**

**(२) तारांकित प्रश्नांची उत्तरे QIS या वेब ॲप संगणकीय प्रणालीद्वारे ऑनलाईन पध्दतीने तसेच छापील स्वरुपात प्रत्येकी ३ (तीन) प्रतीमध्ये विहित मुदतीत या सचिवालयाकडे पाठविण्यात यावीत.**

**(३) तसेच तारांकित प्रश्न सूचना विभागाकडे प्राप्त झाल्यानंतर, उक्त सूचना अन्य विभागाकडे हस्तांतरित होत असल्यास, संबंधित विभागाने हस्तांतरणाबाबतची कार्यवाही तात्काळ करावी व प्रश्न सूचना ज्या विभागाला हस्तांतरित झाली आहे, त्या विभागाने सदरहू प्रश्न सूचनेचे उत्तर विहित मुदतीत या सचिवालयाकडे पाठवावे.**

धजगताप

**(धनश्री जगताप)**
कक्ष अधिकारी,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**प्रति,**

(१) मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अपर मुख्य सचिव
(२) मा.उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव
(३) मा.मंत्री व मा.राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव
(४)सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई
यांना माहितीसाठी तथा कार्यवाहीसाठी अग्रेषित

# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे (हिवाळी) अधिवेशन, २०२२

## तारांकित प्रश्नांच्या उत्तराचा दिनांक तसेच विभागाकडून उत्तर येण्याचा अंतिम दिनांक इत्यादीबाबतची माहिती दर्शविणारे विवरणपत्र

| गट क्र.<br>(१) | गटामध्ये समाविष्ट असलेले मंत्री<br>(२) | प्रश्नांच्या उत्तराचा वार व दिनांक<br>(३) | विभागाकडून उत्तर येण्याचा वार व दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| एक | (१) ग्रामविकास व पंचायत राज, वैद्यकीय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण मंत्री<br>(२) पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री<br>(३) कामगार मंत्री<br>(४) सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री<br>(५) पर्यटन, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता, महिला व बालविकास मंत्री | सोमवार, दिनांक, १९ डिसेंबर,२०२२<br>सोमवार, दिनांक, २६ डिसेंबर,२०२२<br>*सोमवार, दिनांक, २ जानेवारी,२०२३ | शुक्रवार, दिनांक ९ डिसेंबर, २०२२<br>शुक्रवार, दिनांक १६ डिसेंबर, २०२२<br>*शुक्रवार, दिनांक २३ डिसेंबर, २०२२ |
| दोन | (१) महसूल, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास मंत्री<br>(२) वने, सांस्कृतिक कार्ये, मत्स्यव्यवसाय मंत्री<br>(३) रोजगार हमी योजना, फलोत्पादन मंत्री<br>(४) कृषि मंत्री<br>(५) सहकार, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री<br>(६) राज्य उत्पादन शुल्क मंत्री | मंगळवार, दिनांक, २० डिसेंबर,२०२२<br>मंगळवार, दिनांक, २७ डिसेंबर,२०२२<br>*मंगळवार,दिनांक, ३ जानेवारी, २०२३ | सोमवार, दिनांक १२ डिसेंबर, २०२२<br>सोमवार, दिनांक १९ डिसेंबर, २०२२<br>*सोमवार, दिनांक २६ डिसेंबर,२०२२ |
| तीन | मुख्यमंत्री | बुधवार, दिनांक २१ डिसेंबर,२०२२<br>बुधवार, दिनांक २८ डिसेंबर,२०२२<br>*बुधवार, दिनांक ४ जानेवारी,२०२३ | मंगळवार, दिनांक १३ डिसेंबर, २०२२<br>मंगळवार, दिनांक २० डिसेंबर, २०२२<br>*मंगळवार, दिनांक २७ डिसेंबर,२०२२ |
| चार | (१) उप मुख्यमंत्री<br>(२) आदिवासी विकास मंत्री<br>(३) बंदरे आणि खनिकर्म मंत्री | गुरुवार, दिनांक २२ डिसेंबर,२०२२<br>गुरुवार, दिनांक २९ डिसेंबर,२०२२<br>*गुरुवार, दिनांक ५ जानेवारी २०२३ | बुधवार, दिनांक १४ डिसेंबर, २०२२<br>बुधवार, दिनांक २१ डिसेंबर, २०२२<br>*बुधवार, दिनांक २८ डिसेंबर, २०२२ |
| पाच | (१) उच्च व तंत्रशिक्षण, वस्त्रोद्योग, संसदीय कार्ये मंत्री<br>(२) अन्न व औषध प्रशासन मंत्री<br>(३) उद्योग मंत्री<br>(४) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून), अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री<br>(५) शालेय शिक्षण, मराठी भाषा मंत्री | शुक्रवार, दिनांक २३ डिसेंबर,२०२२<br>शुक्रवार, दिनांक ३० डिसेंबर, २०२२<br>*शुक्रवार, दिनांक ६ जानेवारी, २०२३ | गुरुवार, दिनांक १५ डिसेंबर, २०२२<br>गुरुवार, दिनांक २२ डिसेंबर, २०२२<br>*गुरुवार, दिनांक २९ डिसेंबर, २०२२ |

* आगामी अधिवेशनाच्या सोमवार, दिनांक १९ डिसेंबर, २०२२ ते शुक्रवार, दिनांक ३० डिसेंबर, २०२२ या कालावधीत वाढ झाल्यास पूर्वखबरदारी म्हणून एक आठवडयाच्या जादा प्रश्न सूचना कार्यवाहीत घेण्यात येत आहेत.